# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
## (सकाळ)

जा.क्र. ४९२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–१०/०८/२०१६.

**१) नगदी पैशाची व सोन्याचे दागीण्याची फसवनुक . :–**

दिनांक ०२/०७/२०१६ ते ०९/०७/२०१६ रोजी चे ११.०० वा. दर. यातील आरोपी हा फॉरेस्ट विभागात रेन्जर असल्याचे फिर्यादीला खोटे सांगुन त्याच्या घरी भाडयाने राहीला व घर दुरूस्ती करीता बिल्डींग मटेरीयलची आवश्यक्ता असल्याने व फिर्यादी कडे पुरेसे पैसे नसल्याने आरोपीने त्याचे ओळखीचे दुकानदाराकडुन स्वस्त दरात मटेरीयल मिळवुन देन्याची हमि देवुन मटेरीयल घेण्याकरीता फिर्यादी कडुन नगदी २०,०००/–रू. व सोन्याचे दागीने कि. १,१०,०००/–रू. चे गाहान ठेवुन पैसे मिळवण्याकरीता फिर्यादी कडुन सोन्याचे दागीने विश्वासाने घेतले व फरार झाला. यातील आरोपीने फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करून एकुण १,३०,०००/–रू. ची फसवणुक करून पसार झाल्याने फिर्यादी मिरा संतोष भट वय ५१ वर्ष रा. विनोबा नगर तुमसर यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४२०,५०६ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. श्रिवास पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**२) ठार मारण्याची धमकी देवुन अत्याचार केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०८/०८/२०१६ रोजी २३.०० वा. दर. यातील फिर्यादी ही तीचे पतीचे रखवालीतुन आरोपीने फिर्यादीस पळवुन नेले. फिर्यादीस व तीचे मुलास ठार मारण्याची धमकी देवुन तीच्यावर अत्याचार केला व दि. ०८/०८/२०१६ चे २३.०० वा यातील आरोपी हा फिर्यादीचे घरी आत जावुन तीचा हात धरून विनयभंग केल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३६३,३६६,३७६,(१)(२)(९),४५२,३५४,५०६ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. इंगोले पो.स्टे. कारधा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) शिक्षकाची विद्यार्थावर अत्याचार करण्याचा प्रयत्न. :–**

दिनांक ०८/०८/२०१६ रोजी १९.३० वा. दर. यातील आरोपीने आदर्श विद्यालय पारडी येथील संगणक रूम मध्ये रूम लॉक करून आरोपीने स्वत:चे वस्त्र काढुन अल्पवयीन मुलगा याचे सोबत जबरीने अती प्रसंग करण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलस स्टेशन दिघोरी येथे कलम ३७७,५११,भादंवि सहकलम ८, ९ (फ) लैगिंक अपराधा पासुन बालकाचे संरक्षण कायदा २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. यादव पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

४) अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी. :–

दिनांक १०/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा,कारधा, गोबरवाही व साकोली येथील परीसरातील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २८ लिटर हातभट्टी दारू कि. २,३००/–रु. तसेच जुगारातुन कि. १,०००/– रु. असा एकुण कि. ३,३०० /–रू. चा माल जप्त करण्यात आला.

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

प्रत, **संगणक कक्ष**, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.